## मुख्याध्यापक संदेश

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, फोंडाघाट या संस्थेची स्थापना २८ एप्रिल १९७२ रोजी झाली. या संस्थेस आज ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ६५ वर्षापुर्वी समाजातील निरक्षर, गरीबीने ग्रासलेल्या सर्व स्थरातील लोकांच्या प्रगतीचा विचार करुन एक अवघड स्वप्न सत्यात उतरवून फोंडाघाटमधील शिक्षणप्रेमी विचारवंतानी गावातील सर्वांच्या मनातील प्रेम, जिद्द , त्याग व निरपेक्ष भावना यांचा सुरेख संगम साधुन, शिक्षणापासुन वंचित असलेल्या समाजाला अज्ञानातुन मुक्त करुन ज्ञानाकडे नेण्याचे आव्हान स्विकारुन **''फोडाघाट एज्यु. सोसायटी, फोंडाघाट''** या संस्थेची उभारणी केली व **'न्यू इंग्लिश स्कूल, फोंडाघाट'** या नावाने माध्यमिक शाळेची स्थापना केली. संस्थेने त्या काळी लावलेल्या एका लहान रोपटयाचे आज एका विशाल वटवृक्षात रुपांतर झाले आहे. अशा या संस्थेच्या माध्यमिक प्रशाळेत दिनांक १०/०६/१९८५ पासून मी **सहा. शिक्षक** या पदावर रुजू होवून दिनांक ०१/०५/२०१८ पासून **मुख्याध्यापक** या पदावर काम करण्याचं मला भाग्य लाभत आहे.

सन १९७२ मध्ये एकूण २२ विद्यार्थ्यामधून इयत्त ८ वी चा एक वर्ग सुरु करुन संस्थेने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली होती. आज इयत्ता ५ वी ते १० च्या माध्यमिक शाखेच्या एकूण १७ तुकडया असून त्यामध्ये ६६७ विद्यार्थी, तसेच उच्च माध्यमिक शाखेकडे कला, वाणिज्य,विज्ञान, व व्यवसाय अभ्यासक्रमाचे वर्ग सुरु असून त्यामध्ये ५८६ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

संस्थेने माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु केल्यामुळे आज फोंडाघाट व फोंडाघाट पंचक्रोशीतील अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी उच्च शिक्षित होवून डॉक्टर, वकिल, इंजिनिअर, आर्किटेक्चर, बॅक मॅनेजर, चॉर्टर्ड अकौंटंट, प्राध्यापक, शिक्षक,उद्योजक, तसेच शासकिय व निमशासकिय क्षेत्रात देश विदेशात कार्यरत आहेत हे पाहून आमच्या प्रशाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा उर अभिमानाने भरुन येतो. सन १९७२ पासुन आजअखेर विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्याचे मी अभिनंदन करतो. आजच्या तांत्रिक व डिजीटल युगात या संस्थेच्या प्रशाळेतील विद्यार्थ्याना जागतिक स्पर्धेत उतरता यावे यासाठी माझ्या संस्थेचे संचालक मंडळ, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी कटिबध्द आहोत. **॥ न हि ज्ञानेनं सदृशं पवित्रमिह विद्यते ॥** हे ब्रीद लक्षात ठेवून आम्ही ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहोत. संस्था स्थापनेपासुन अनेक संस्था सभासदांनी व माजी विद्यार्थ्यांनी आपले योगदान देवून संस्था प्रगतीपथावर आणण्याचे उत्कृष्ट कार्य केले आहे.

संस्थेने आपली जी वेबसाईड तयार केली आहे. त्या माध्यमातुन संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाखेच्या सर्व माजी विद्यार्थ्याना संस्थेच्या चालू घडामोडी व संस्थेच्या प्रगतीचा माहितीपट एका क्लिकवर जिथे असतील तिथे देश-विदेशात पहायला मिळेल व त्यांना आपल्या शालेय जीवनातील आठवणीना उजाळा देता येईल यात शंका नाही. आनी तो प्रत्येकाच्या जीवनातील एक आनंदाचा क्षण असेल असे मला वाटते. आज संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ संस्थेच्या प्रगतीसाठी अनेक उपक्रम राबवत आहे. त्याबद्दल संस्थेच्या सर्व सभासद व संचालक मंडळाचे मी अभिनंदन करतो व संस्थेच्या पुढील वाटचालीस मी व माझ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाळेच्या सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो !!!



श्री.तुकाराम दत्तात्रय गुरव

मुख्याध्यापक

न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज फोंडाघाट,